# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १७/०२/२०२१

## मा. स्थायी समिती सभा
## सभा सूचना क्र. ०८

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ..............................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. २२/०२/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/०२/२०२१ सभा सुचना क्र. ०८ विषय पत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत - निरंक |
| --- | मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज – निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| ६७ | भाईंदर (प.) येथील उत्तन रोडवरील डोंगरी आईस फॅक्टरी ते तलाव (बोर्जीस यांचे घर पर्यंत) बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे (अंदाजित रक्कम रु. ४१,९९,७००/-) या कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ६८ | अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) या वाहनाचे अत्यावश्यक स्पेअर पार्टस व इतर साहित्य खरेदी करणेबाबात. |
| ६९ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२, ७ (जुना) १५८/२,७ (नविन) या जागेतील आरक्षण क्र.२६४ अे येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथे श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३० फुट उंच आश्वारुढ पुतळा बसविणे कामाच्या निविदेस मान्यता देणेबाबत. |
| ७१ | विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ७२ | निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (विद्युत विभाग) |
| ७३ | निविदेस मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे प्रकरण क्र.६१ फेरसादर) (सार्व. बांधकाम विभाग) |
| ७४ | मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| ७५ | मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ व नगररचना ०८ mbps Internet Leaseline कामी निविदेचे (दोन वर्ष कालावधीकरीता) अवलोकन करणे. |
| ७६ | मान्यता प्राप्त जाहिरात यादीत वृत्तपत्रांचा नव्याने समावेश व दरवाढ/श्रेणीवाढ लागू करणेकामी मा. स्थायी समिती सभेमध्ये विषयाचे अवलोकन करणेबाबत. |
| ७७ | मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, सर्व प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालय, दवाखाने, हॉस्पीटल लोकल एरिया नेटवर्कने जोडणेकामी निविदेचे अवलोकन करणे. |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- १७/०२/२०२१

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
मा. स्थायी समिती सभा दि.२२/२ /२०२१.

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ६७ :- भाईंदर (प.) येथील उत्तन रोडवरील डोंगरी आईस फक्टरी ते तलाव (बोर्जिस यांचे घर पर्यंत) बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे (अंदाजित रक्कम रु.४९,९९,७००/-) या कामाच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

सदर कामाची निविदा सुचना क्र.३५ दि.१७/०३/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदा बारंवार प्रसिध्द केल्यानंतर देखील प्रतिसाद न मिळाल्यामुळे फेर-निविदा सुचना क्र.१० दि.३१/०७/२०२० रोजीच्या मुंबई लक्षदिप व साप्ता. परशुराम समाचार मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता प्रसिद्धअंती दि.११/०८/२०२० पर्यंत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्थी नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र झालेले आहेत. त्यानुसार आर्थिक देकार लिफाफा उघण्यास दि.१२/१०/२०२० रोजी मा. निविदा समितीने शिफारस केलेली आहे व मा.आयुक्त सो यांनी दि.२०/१०/२०२० रोजी मंजुरी दिलेली आहे.

मा. आयुक्त यांच्या समवेत झालेल्या अंतिम वाटाघाटीमध्ये **मे. विंध्या ट्रेडर्स** यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर कमी करुन सदरचे काम अंदाजपत्रक दराने करण्यास तयार असल्याचे पत्र दिलेले आहे. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे अंतिम दर प्राप्त झाले आहेत.

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.९०% जास्त दर<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दर |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)

कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\E DRIVE DATA\Rane\Goshwara\2020-21\Goshwara - Nivida Manjuri - Standing - NS - 10-02.doc

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/ २ /२०२१

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ६८ ) अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) या वाहनाचे अत्यावश्यक स्पेअर पार्टस् व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे ३९.०० मी. उंचीचे टी. टी. एल. वाहन हे मे. रोझनबाउर इंटरनॅशनल यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहे. सदर वाहन दि. २२/०५/२०१२ रोजी अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दाखल झाले असुन आजतागायत कार्यरत आहे. सदरचे वाहन हे अद्ययावत व संपुर्णत: विदेशी बनावटीचे असल्याने सदर वाहनाचे वेळच्यावेळी मेंटेनन्स होणे आवश्यक आहे. मे. रोझनबाउर या कंपनीने भारतात मेंटनन्स करिता अधिकृत केलेले मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सदर वाहनाचे काही सुटे भाग कमकुवत झाले असल्याने ते लवकरात लवकर बदलणेबाबत कळविले आहे. सदर कमकुवत झालेले साहित्य निकामी झाल्यास वाहन नादुरुस्त अवस्थेत जाउन अग्निशमन विभागाची मोठी गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असल्याने व अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत केवळ या बनावटीचे एकमेव वाहन उपलब्ध असल्याने शहरातील आगीच्या घटना पाहता सदर वाहन कायम सुसज्ज राहणे अत्यंत आवश्यक बाब आहे. सदर वाहन हे विदेशी बनावटीचे असुन विशिष्ट तंत्रज्ञानाचे आहे. सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे केवळ त्याच कंपनीत उत्पादीत केले जात असल्याने बाजारात इतरत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे त्यांचे कंपनीकडुनच खरेदी करावे लागतात. सदरचे साहित्य हे विदेशातुन आयात करावे लागत असल्याने साहित्य अग्निशमन विभागास प्राप्त होईपर्यंत मोठा कालावधी उलटुन जात असतो. सदर कालखंडात निकामी झालेला वाहनाचा पार्टस वेळीच उपलब्ध न झाल्याने त्याच्याशी संलग्न असलेला इतर कोणता पार्टस खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब लक्षात घेता वाहनात बिघाड होवुन वाहन नादुरुस्त अवस्थेत जाणेपुर्वी मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सुचविलेले वाहनाचे सुटे भाग आगाउ खरेदी करुन वाहनाची सर्व्हिसिंग केल्यास संभाव्य अडचणी टाळता येतील. त्याकरीता वाहनाचे अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करणे करिता मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये मा. स्थायी समिती सभे समोर ठेवण्यात येत आहे.

सदर वाहनांकरिता आवश्यक असणा-या स्पेअरपाट्‌र्स बाबतचा संपुर्ण तपशील खालिलप्रमाणे.

| Sr. No. | Item | Qty. | Rate (per unit) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Socket | 02 | 8086 | 16172 |
| 02 | Proximity switch reed contact magnet | 01 | 14296 | 14296 |
| 03 | Proximity switch closer M5 with cable cage door | 02 | 4998 | 9996 |
| 04 | Potentiometer | 02 | 15976 | 31952 |
| 05 | Toothed belt | 01 | 2658 | 2658 |
| 06 | Microphone | 01 | 112394 | 112394 |
| 07 | Proximity switch opener / Closer 15 mm cuboid | 03 | 10329 | 30987 |
| 08 | Seal kit cylinder 160/90 for metz M 6122-422007 | 02 | 115097 | 230194 |
| 09 | Loudspeaker Visaton | 02 | 6715 | 13423 |
| 10 | Bulb lamp 28v 1.2W base T 5.5 | 08 | 620 | 4960 |
| 11 | Proximity switch closer 8 mm M18 Cable 2m | 01 | 33453 | 33453 |
| 12 | Loudspeaker | 02 | 26726 | 53452 |
| 13 | Rear Wall | 02 | 71157 | 142314 |
| 14 | Spring Lock | 01 | 11085 | 11085 |
| 15 | Round spring lock with push-button | 03 | 2128 | 6384 |
| 16 | Proximity switch opener/closer -15mm cuboid | 01 | 30987 | 30987 |
| 17 | Proximity switch closer 8mm M18/M12 | 02 | 12307 | 24614 |
| 18 | Prpximity switch shutter 8 mm M18/M12 | 02 | 13533 | 27066 |
| 19 | Collar | 01 | 19271 | 19271 |
| 20 | Draw – wire sensor | 01 | 123623 | 123623 |
| 21 | Potentiometer | 01 | 31953 | 31953 |
| 22 | Bellows | 08 | 5609 | 44872 |
| 23 | Guide plate green 200 x 80 x 25 Ladderset | 02 | 30038 | 60076 |
| 24 | Guide plate Green 160 x 62 x 20 Ladderset | 02 | 23297 | 46594 |
| 25 | Guide plate Green 160 x 72 x 22 Ladderset | 02 | 24934 | 49868 |
| 26 | Guide plate Green 160 x 120 x 30 Ladderset | 02 | 44461 | 88922 |
| 27 | Super long time grease 500 G tube | 01 | 2876 | 2876 |
| 28 | Grase for ladder set | 04 | 2571 | 10284 |
| 29 | Filter inlet for main hydraulic hawe | 01 | 51296 | 51296 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 30 | Seal kit for high pressure filter main hydraulic | 01 | 51296 | 51296 |
| 31 | Filter water/fuel sepertor filter catridge | 01 | 51296 | 51296 |
| 32 | Service kit | 01 | 51296 | 51296 |
| 33 | Display colour cab 800 x 480 pixel MTMO | 01 | 445479 | 445479 |
| 34 | Air filters | 01 | 7191 | 7191 |
| 35 | TS filter inserst | 01 | 1191 | 1191 |
| 36 | Filter | 01 | 2305 | 2305 |
| 37 | V- Ribbed Belt | 01 | 2293 | 2293 |
| 38 | Pollen Filter | 01 | 4121 | 4121 |
| 39 | TS TS Part Sets, Miscelleanous | 01 | 271 | 271 |
| 40 | Filter | 01 | 56502 | 56502 |
| 41 | Oil fiter Housing / Oil filter | 01 | 1118 | 1118 |
| 42 | Filter Element | 01 | 24966 | 24966 |
| 43 | Lu unit pump PLN | 06 | 27146 | 162876 |
| 44 | O-Rings | 06 | 38 | 228 |
| 45 | Seal Ring Kit | 06 | 829 | 4974 |
| 46 | ZB Nozzle Holder Compl | 06 | 8180 | 49080 |
| 47 | Seals Special Types | 01 | 2515 | 2515 |
| 48 | TS Wiper Blade | 01 | 6891 | 6891 |
| 49 | Coolant | 10 Ltr | 1255 | 12550 |
| 50 | Engine Oil | 36 Ltr | 2304 | 82944 |
| 51 | Transmission Oil | 25 Ltr | 1591 | 39775 |
| 52 | Axle Oil | 25 Ltr | 1382 | 34550 |
| 53 | Cotton waste | 10kgs | 196 | 1960 |
| 54 | Cage levelling cylinder | 01 | 79,835 | 79,835 |
| A | Sub Total Valve of Spare Parts & Maintance Service | | | 2503525.00 |
| B | **Sub Total Valve of GST 18% On Spare Parts & Maintance Service** | | | **450634.50** |
| C | **FREIGHT CHARGES** | | | **142863.78** |
| D | **GST ON FREIGHT CHARGES @28%** | | | **40001.86** |
| E | **Serice Charges for Repaire & Prvenntive Maintance On TTL By 2 Service Techician for 12 days** | | | **701204.00** |
| F | **GST 18% for Sarvice Charges** | | | **126216.72** |
| | **GRAND TOTAL (A to F)** | | | **39,64,445.88** |

मे. ॲंगलॉन टेक्नोलॉजी सोलुशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या उपरोक्त नमुद दरानुसार वरील नमुद साहित्य खरेदी करीता रु. ३९,६४,४४५.८८/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच कंपनीने दिलेल्या कोटेशन मधील अटीशर्तीनुसार सदर रक्कम आगाउ अदा करावयाची आहे. सदर रक्कमेपैकी साहित्य खरेदी करिता रु. ३१,३७,०२५.१६/- इतकी रक्कम आगाउ अदा करावयाची आहे. व सदर साहित्य वाहनात बसविणे सर्विसिंग इत्यादी कामाकरीता जी.एस.टी सह सर्व्हिसिंग चार्जेस रु. ८,२७,४२०.७२/- इतकी (उर्वरित) रक्कम वाहनांचे दुरुस्ती व मेन्टेन्सचे काम पुर्ण झाल्यानंतर अदा करणे योग्य राहिल.

तरी मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांना कार्यादेश प्रदान करतेसमयी म्हणजेच आगाउ रक्कमे इतकी रु. ३१,३७,०२५.१६/- या समान मुल्याचे बँक गॅरेंटी घेणे योग्य होईल. सन २०२०-२१ या आर्थिक व साधन सामुग्री व भांडारे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १५०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदीतुन ३.४७ लाख इतका खर्च झाला असुन १४६.५३ लाख इतकी तरतूद शिल्लक आहे.

तरी अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता व सदरचा प्रस्ताव हा अत्यावश्यक सेवेचा असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये असल्याने अग्निशमन विभागातील टी.टी.एल वाहनाकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार रु. ३९,६४,४४५.८८/- इतक्या खर्चास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(signature)
उप-आयुक्त
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. २९/१/२०२१ वेळ सायं ४.२०
मा. स्थायी समिती / ~~मा. महासभा~~ गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ......६४...... वर्ष :- २०२०-२१
(signature) २९/१/२०२१
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२२/२ /२०२१

## पे ॲण्ड पार्क विभाग

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. ६९ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२, ७ (जुना) १५८/२,७ (नविन) या जागेवरील आरक्षण क्र. २६४ अे येथील वाहनतळ ठेका पद्धतीने चालविणेकामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**(Tender ID- 2020_MBMC_540753_1)

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२, ७ (जुना) १५८/२,७ (नविन) या जागेवरील आरक्षण क्र. २६४ अे येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेबाबत निविदा दि.१५/०२/२०२० रोजीच्या दै.वृत्तमानस व दै. परशूराम समाचार या वृत्तपत्रातून जाहिर व्दितीय मुदतवाढ निविदा प्रसिध्द केलेली होती. सदर कामी ई टेडरींग पध्दतीने निविदा कालावधीत पुढील तीन निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. १) मे. आशुतोष इंटरप्रायजेस २) मे. जे.टी रोंदळ ३) मे. रविंद्र आत्माराम माधवी यांनी अटीशर्तीनुसार कागदपत्रांची योग्यती पुर्तता केल्यामुळे मा. निविदा निवड समितीने निविदेतील **१) मे. आशुतोष इंटरप्रायजेस, २) मे.जे.टी रोंदळ, ३) मे. रविंद्र आत्माराम माधवी** आर्थिक देयकार लिफाफा (Finacial Bid) उघडणेकामी दि.०९/०३/२०२० रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानूसार दि.१३/०३/२०२० रोजी सदर पात्र निविदाधारकांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यात आलेले आहे.

दि. २/६/२०२० रोजी मा.निविदा समितीने प्रस्तावित जागेमध्ये Covid 19 अंतर्गत DCHC उभारुन त्यामध्ये कोरोना बाधीत रुग्णावर प्रतिबंधात्मक वैद्यकीय उपचार करण्यात येणार असल्याने निविदा वैधतेचा कालावधी वाढविण्यात आला होता. परंतु काही अपरिहार्यकारणास्तव उभारण्यात आले नसल्याने पुन्हा पे ॲण्ड पार्क सुरु करण्यात मा.आयुक्त यांनी दि. २९/९/२०२० रोजी मान्यता दिलेली आहे.

सदर निविदेतील पात्र निविदाधारकांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदेमधील वार्षिक मुल्याधिकारीक रक्कम रुपये. | निविदाधाराकांने निविदेत सादर केलेले वार्षिक रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | मे. आशुतोष इंटरप्रायजेस | मे. जे.टी रोंदळ | मे. रविंद्र आत्माराम माधवी |
| १ | प्रथम वर्ष .१६,७३,२००/- | १८,८५,७८६/- | १३,००,००१/- | १८,००,०००/- |
| | व्दितीय वर्ष रु.१६,७३,२००/- | २२,६२,९४३/- | १३,००,००१/- | १७,५०,०००/- |
| | तीसरे वर्ष रु. १६,७३,२००/- | २७,८३,४२०/- | १३,००,००१/- | १८,५०,०००/- |
| | **एकूण रु.५०,१९,६००/-** | **६९,३२,१४९/-** | **३९,००,००३/-** | **५४,००,०००/-** |

वरील तक्ता पाहता **मे. आशुतोष एंटरप्रायजेस** यानी उधृत केलेले दर सर्वात जास्त आहेत. **मे. आशुतोष एंटरप्रायजेस** यांनी सादर केलेली रक्कम रु.६९,३२,१४९/- हे सर्व प्रकारचे करविरहित आहेत.

तथापी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या वार्षीक रक्कमेवर शासकीय कर व १८% जीएसटी भरणेची जबाबदारी ठेकेदार (मे. आशुतोष एंटरप्रायजेस) यांची राहील.

करीता **मे. आशुतोष एंटरप्रायजेस** यांना ३ वर्षाचे कालावधी करिता पे ॲण्ड पार्क ठेका पध्दतीने चालविणेस मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणेस शिफारस असे.

(संभाजी वाघमारे)
उप-आयुक्त (पे ॲन्ड पार्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\PAY & PARK DEPT\Goshwara\5. 387 Navaghar goshawara.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/२ /2020.

### बांधकाम विभाग

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक :- ( ७० )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथे श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा 30 फुट उंच अश्वारुढ पुतळा बसविणे कामाच्या निविदेस मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर सगणादेवी मंदिरा जवळ घोडबंदर जैसलपार्क 60 मीटर रुंद रस्ता व 18 मीटर रुंद रस्ता तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. 08 जवळ महानगरपालिकेच्या नव्याने होणाऱ्या प्रवेशद्वारावर श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा बसविणेच्या कामास मा. महासभा दि.02/03/2019 ठराव क्र. 136 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त आहे. सदर पुतळा बसविणे कामी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पुतळा 3116/प्र.क्र.308/29 दि.2 मे 2017 अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत पुतळा समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. सदर पुतळा समितीस प्रस्ताव सादर करण्यापूर्वी पुतळा तयार करण्यासाठी शिल्पकाराची नेमणूक करावी लागेल. सदर पुतळयाचा चबुतरा, आराखडा, पुतळयाचे साईट प्लान, पुतळा ज्या धातू / साहीत्यापासून तयार करण्यात येणार आहे. त्याचे वजन, उंची व रंग यांचा तपशिल, पुतळयाचा रेखाचित्राबाबत मुख्यवास्तूशास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घ्यावयाची आहे.

पुतळा उभारण्यासाठी शिल्पकाराची नेमणूक करुन पुतळयाचा क्ले मॉडेल तयार करुन त्यास कला संचालनालयाची मान्यता घेऊन ब्रांझ वा अन्य धातू, फायबर वा इतर साहित्यापासून पुतळा तयार करावा लागेल. पुतळा बसविणेसाठी पोलिस विभागाचे तसेच स्थानिक लोकांचा विरोध नसल्याबाबत नाहरकत दाखले, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणून नगरविकास विभागाचा नाहरकत दाखला सादर करावा लागेल.

सदर पुतळा बसवावयाची जागा ही विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली असून मंजूर विकास योजनेत आरक्षित असल्याचे दर्शविण्यात आलेली आहे. सदर जागेत कुंपणभिंत बांधुन जागा सुशोभित करण्यास कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये I A No 10 of 2012 in S.L.P (C) No. 8516 of 2006 व W.P (c) No 314/2020 बाबत दि.18/01/2013 अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे पालन करुन त्याचे उल्लघंन होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावयाचे आहे. सदर आदेशात खालीलप्रमाणे नमूद आहे.

1) राज्य शासनाकडून सार्वजनिक रस्ते, फुटपाथ व इतर सार्वजनिक सुविधा ठिकाणी पुतळा उभारण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

सदर पुतळा बसवावयाची जागा ही तीन रस्त्यामधील जंक्शनची विकास योजनेत दर्शविलेली जागा असून त्या ठिकाणी फक्त पुतळा बसवून व जागा बंदीस्त करुन सुशोभिकरणाचे काम करण्यात येणार आहे. सदर 30 फुट उंचीचा पुतळा तयार करणेसाठी रु.2,92,05,000/- (अक्षरी रुपये दोन कोटी ब्याण्णव लक्ष पाच हजार मात्र) एवढया रकमेची निविदा मा. स्थायी समिती सुभेपुढे सादर करण्यात आली असता मा. स्थायी समिती सभा दि. 11/05/2020 ठराव क्र. 05 अन्वये सदर निविदा सविस्तर माहीतीसह पुढील सभेत ठेवण्यात यावी असा निर्णय घेतला. सदर धातुचा पुतळा प्रत्यक्षात जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत पुतळा समितीने मान्यता दिल्यानंतर तयार करावयाचा आहे. प्रथम टप्प्यात विविध स्तरावरील मान्यतेसाठी पुतळयाचा क्ले मॉडेल तयार करावयाचा आहे. या बाबत शिल्पकार यांना स्पष्ट आदेश देण्यात येतील. सदर कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | 458572_1 | घोडबंदर प्रवेशव्दार येथे श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा ब्रॉन्झ चा अश्र्वारुढ पुतळा उभारणेसाठी शिल्पकार नेमणे. (30 फुट) | रु. 29205000.00 |

| DESCRIPTION | QTY | UNIT | GARNET INTERIOS PRIVATE LLIMITED | NEGOSITION |
|---|---|---|---|---|
| | | | RATE | |
| Appointment of Artificer work for Installation of Bronze Metal Horse ridding Statue of Chhatrapati Shivaji Maharaj at Ghodbunder Entrance in MBMC Area. (30 feet) | 1 | Nos. | 29500000.00 | 29205000.00 |

वरील प्रमाणे निविदेस मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

गोषवारा प्राप्त दि. 23/11/2020 वेळ 3.30 PM
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 190 वर्ष :- 2020-21

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-7/DK/2020-21/SG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. स्थायी समिती सभा दि.२२/२ /2021

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. (८७ ) :- विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.**

**1) कॉंक्रिट रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरित करणे. (Tender Id :- 626453_1)**
**(अंदाजित रक्कम रु. 4,00,00,000/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **1) मे. एस.बी.खकाळ** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 9.9999% कमी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 9.9999% कमी दर** |
| 2) मे. प्रलिता इन्फ्राप्रोजेक्ट | अंदाजपत्रक दरापेक्षा 7.02% कमी दर |
| 3) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा 9.80% जास्त दर |
| 4) मे. भारत कंस्ट्रक्शन | अंदाजपत्रक दरापेक्षा 10.20% जास्त दर |

**2) भाईंदर (प) उत्तन येथील उत्तन नाका ते रमा हॉटेल पाली पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**
**(अंदाजित रक्कम रु.96,87,000/-) (Tender Id :- 626464_1)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **1) मे. शिखर कंस्ट्रक्शन** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 7.30% कमी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 7.30% कमी दर** |
| 2) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा 8.01% जास्त दर |
| 3) मे. भारत कंस्ट्रक्शन | अंदाजपत्रक दरापेक्षा 10.15% जास्त दर |

**3) मिरारोड (पुर्व) बालाजी हॉटेल ते सृष्टी जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**
**(अंदाजित रक्कम रु.38,50,000/-) (Tender Id :- 626520_1)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **1) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 8.08% जास्त दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% कमी दर** |
| 2) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा 9.50% जास्त दर |

**4) मिरारोड (पुर्व) डेल्टा जंक्शन ते दालमिया कॉलेज जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (अंदाजित रक्कम रु.45,00,000/-)** (Tender Id :- 626537_1)

| **ठेकेदाराचे नाव** | देकार |
|---|---|
| **1) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 7.01% जास्त दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% कमी दर** |
| 2) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा 9.60% जास्त दर |

**5) मिरारोड (पुर्व) कनाकिया येथील मेरीगोल्ड 1,2 पासून युनिक हाईट पुनम गार्डन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (अंदाजित रक्कम रु.53,50,000/-)** (Tender Id :- 626553_1)

| **ठेकेदाराचे नाव** | देकार |
|---|---|
| **1) मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 7.99% जास्त दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% कमी दर** |
| 2) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा 9.70% जास्त दर |

उपरोक्त कामांच तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. 1 च्या कामांकरीता **मे. एस.बी.खकाळ** अ.क्र.2 च्या कामाकरीता **मे. शिखर कंस्ट्रक्शन** व अ.क्र. 3 ते 5 च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२२/ २ /2021

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( ७४ ) :- मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचे अवलोकन करणे.**
**(पाणी पुरवठा विभाग)**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु.) | कंत्राटदाराचे नाव | मंजुर निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वापरांच्या विहीरींची साफसफाई व दुरुस्ती करणे. | रु.24,06,400/- | मे. ओमकार इंटरप्रायजेस | रु.24,06,400/- |
| २. | महानगरपालिका क्षेत्रातील क्लोरीनेशन प्लांटची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे. | रु.10,60,000/- | मे. ॲक्वामेक इंटरप्रायजेस | रु.10,49,400/- |
| ३. | क्लोरीनेशन प्लांटसाठी वार्षिक क्लोरीन सिलेंडरचा पुरवठा करणे. | रु.24,52,500/- | मे. ॲक्वामेक इंटरप्रायजेस | रु.24,27,975/- |
| ४. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गितानगर जलकुंभावरील 500 मि.मी. व्यासाच्या व हटकेश परिसरातील मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या 600 मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनवर इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | रु.24,83,284/- | मे. सुवास इलेक्ट्रिकल्स | रु.24,83,284/- |
| ५. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्वर पार्क, महाजनवाडी व आकृत्ती जलकुंभावरील 500 मि.मी. व्यासाच्या व नवघर जलकुंभावरील 600 मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनवर इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | रु.24,80,707/- | मे. सुवास इलेक्ट्रिकल्स | रु.24,80,707/- |
| ६. | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाटलीपाडा येथे एम.आय.डी.सी. व स्टेम जलवाहिन्यामध्ये 1350 मि.मी. व्यासाची अंतरजोडणी करणे. | रु.24,84,630/- | मे. एस. बी. खकाळ | रु.25,84,015/- |
| ७. | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत साकेत येथे एम.आय.डी.सी. व स्टेम जलवाहिन्यामध्ये 1350 मि.मी. व्यासाची अंतरजोडणी करणे. | रु.24,26,675/- | मे. एस. बी. खकाळ | रु.25,23,742/- |
| ८. | भाईंदर (प.) उत्तन येथील उत्तन जलकुंभ ते स्टेला मॉरीस हॉस्पीटल पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.17,11,300/- | मे. भारत कंन्स्ट्रक्शन | रु.17,11,300/- |
| ९. | भाईंदर (प.) उत्तन येथील उत्तन नाका ते भाटेबंदर जलकुंभापर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,99,800/- | मे. भारत कंन्स्ट्रक्शन | रु.24,99,800/- |
| १०. | भाईंदर (प.) उत्तन येथील उत्तन जलकुंभ ते मार्केट पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,99,000/- | मे. भारत कंन्स्ट्रक्शन | रु.24,99,000/- |
| ११. | भाईंदर (प.) धावगी डोंगर येथील उत्तन गावदेवी मंदिर (धावगी रॉयल शाळा रस्ता) ते अस्लम कुरेशी यांच्या घरापर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,75,600/- | मे. भारत कंन्स्ट्रक्शन | रु.24,75,600/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | भाईंदर (प.) टेंभा रोड येथील राधाकृष्ण पार्क बिल्डिंग ते बेकरी गल्ली रोड पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,99,200/- | मे. भारत कंन्स्ट्रक्शन | रु.24,99,200/- |
| १३. | अस्मिता येथील नविन ऊंच जलकुंभास संरक्षक भिंत बांधणे. | रु.8,91,600/- | मे. व्हि. के. इंटरप्रायजेस | रु.7,79,883/- |
| १४. | काशि ऊंच जलकुंभास संरक्षक भिंत बांधणे. | रु.8,13,200/- | मे. व्हि. के. इंटरप्रायजेस | रु.7,19,601/- |
| १५. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हटकेश परिसरातील मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या 800 मि.मी. व 900 मि.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | रु.22,75,302/- | मे. सुवास इलेक्ट्रिकल्स | रु.22,75,302/- |
| १६. | महाजनवाडी ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम / स्टाफ रुम व संडास बाथरुम बांधणे | रु.13,09,200/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु.11,64,926/- |
| १७. | काशी ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम / स्टाफ रुम व संडास बाथरुम बांधणे | रु.12,62,400/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु..11,23,157/- |
| १८. | शांतीनगर सेक्टर 07 ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम / स्टाफ रुम व संडास बाथरुम बांधणे. | रु.12,62,400/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु..11,22,652/- |
| १९. | मिरा ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम / स्टाफ रुम व संडास बाथरुम बांधणे. | रु.12,62,400/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु..11,22,400/- |
| २०. | घोडबंदर ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम/स्टाफ रुम व पंपिंग रुम बांधणे. | रु.10,69,000/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु..9,50,234/- |
| २१. | कनाकिया ऊंच जलकुंभ येथे स्टोर रुम / स्टाफ रुम व संडास बाथरुम बांधणे. | रु.13,09,200/- | मे. दूर्गेश कंन्स्ट्रक्शन | रु..11,63,879/- |
| २२. | भाईंदर (पुर्व), आझाद नगर येथील गणेश मंदिर ते सुलभ शौचालय पर्यंत 200 मि.मी. व्यासाची व आझाद नगर मधील विविध गल्ल्यांमध्ये 150 मि.मी व्यासाची बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.17,34,900/- | मे. विंध्या ट्रेडर्स | रु.17,34,900/- |
| २३. | भाईंदर (पुर्व), फाटक रोड येथील क्राऊन ईलेक्ट्रिक्लस ते गणेश मंदिर पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,81,700/- | मे. विंध्या ट्रेडर्स | रु.24,81,700/- |
| २४. | भाईंदर (पुर्व), आझाद नगर येथील शनी मंदिर ते दवाखाना व महावीर इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.14,16,100/- | मे. विंध्या ट्रेडर्स | रु.14,16,100/- |
| २५. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहरी (Borewell) ची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे. | रु.17,50,500/- | मे. नरेश बोअरवेल्स | रु.14,82,674/- |
| २६. | एम.एम.आर.डी.ए. कडून रेंटल हाऊसिंग स्किम अंतर्गत लोढा ॲक्वा या इमारती मधील मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.17,83,700/- | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | रु.16,94,515/- |

वरील निविदांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा.स्थायी समिती सभा दि.२२/२/२०२१
## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ७४ ) मिरा भाईदर महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय क्र.01 ते 06 व नगररचना 08 mbps Internet Leaseline कामी निविदेचे (दोन वर्ष कालावधीकरिता) अवलोकन करणे.**

मिरा भाईदर महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय क्र.01 ते 06 व नगररचना 08 mbps Internet Leaseline कामी जा.क्र.मनपा/संगणक/४२७/२०१८-१९ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२८/०१/२०१९ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2019_MBMC_407943_1) आहे. याकामी निविदेस अल्प प्रतिसाद मिळुन एकही निविदा प्राप्त न झाल्याने सदर कामाची दि.१३/०२/२०१९ रोजी फेर निविदा (टेंडर आयडी 2019_MBMC_418410_1) मागविण्यात आली. सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळुन एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदर निविदेस वरील संदर्भिय ३ व ४ अन्वये प्रथम व द्वितीय मुदतवाढ देण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही.

सदर कामाची दि.१८/०६/२०१९ रोजी (टेंडर आय डी 2019_MBMC_451364_1) फेर निविदा मागविण्यात आली. सदर कामास प्रतिसाद न मिळाल्याने एकही निविदा प्राप्त झालेली नाही. याकामी दि.२९/०६/२०१९ रोजी प्रथम मुदतवाढ देऊनही एकही निविदा प्राप्त झालेली नाही. याकामी Pre-bid Query अपलोड करणेस मंजुरी उशिराने प्राप्त झालेली असल्याने सदर कामास दि.०८/०७/२०१९ रोजी द्वितीय मुदतवाढ दिली असता सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळून एकच निविदा प्राप्त झाली. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे.

सदर कामाची दि.०१/०८/२०१९ रोजी (टेंडर आय डी 2019_MBMC_470668_1) फेरनिविदा मागविण्यात आली. सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने एकही निविदा प्राप्त झालेली नाही. संदर्भिय पत्र क्र. 9 व 10 अन्वये दि.14/08/2019 रोजी व दि. 22/08/2019 रोजी अनुक्रमे प्रथम व व्दितीय मुदतवाढ देण्यात आलेली असता एकही निविदा प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर कामास दि.१५/११/२०१९ रोजी फेर निविदा (टेंडर आय डी 2019_MBMC_509350_1) मागविली असता एकही निविदा प्राप्त झालेली नाही. सदर कामास दि.२७/११/२०१९ रोजी प्रथम मुदतवाढ फेर निविदा व दि.०५/१२/२०१९ रोजी द्वितीय मुदतवाढ फेर निविदा मागविली असता सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळून एकच निविदा प्राप्त झाली. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. याकामी दि.३१/१२/२०१९ रोजी फेरनिविदा (टेंडर आय डी 2020_MBMC_527558_1) मागविली असता सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळून एकच निविदा प्राप्त झाली. सदर कामास दि.१०/०१/२०२० रोजी प्रथम मुदतवाढ दिली असता दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. सदर कामास दि.२०/०१/२०२० रोजी द्वितीय मुदतवाढ फेर निविदा मागविली असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचा निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणेस दि.३०/०१/२०२० रोजी मा. उपायुक्त (मु.) तथा अति. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Airnet Wireless Broadband व M/s. Sankrish Systems Technologies या निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्थीप्रमाणे कागदपत्र सादर न केल्याने अपात्र ठरले आहेत. M/s. Oneott Intertainment Limited., या निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्थीप्रमाणे कागदपत्र सादर केल्याने पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारकाचा दराचा लिफाफा उघडणेस दि.०४/०३/२०२० रोजी मा.निविदा निवड समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. पात्र निविदाधारक M/s. Oneott Intertainment Limited., यांनी निविदेत सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| Sr. No. | Description | Rate in Rs. Per Year (including all taxes (Excluding GST) |
|---|---|---|
| 1) | To provide 8 mbps dedicated internet Leaseline (1:1) Per Location at Mira Bhaindar Municipal Corporation Ward office 1,2,3,4,5,6 and Town Planning dept for 2 years (including All Charges like 2 Free bundle of Static IP Per Location, Bandwidth charge, Local Lead Charge, Modem/Router Charge, Fibre optic cable, On sight Support, Installation and commencing, Maintenances charges & Etc. | Rs.60,000/- Per Location X 7 Location = Rs.4,20,000/- वार्षिक<br><br>दोन वर्षाकरिता = Rs.4,20,000/- X 2 = Rs.8,40,000/-<br><br>Rs.10,000/- OTC X 7 Location = Rs.70,000/-<br>Rs.9,10,000/-<br>(अधिक GST) |

मालमत्ता कराची व पाणीपट्टी कराची देयके बजावण्यात आली असून मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरणेस नागरिकांची मोठी गर्दी होते. सदर ठिकाणी कार्यरत असणारी MTNL सेवा वारंवार बंद होत असलेबाबत सहा. आयुक्त (सा.प्र) यांचे वरील संदर्भिय पत्र क्र.१७ अन्वये पत्र प्राप्त झाले आहे. मा. कर निर्धारक व संकलक यांचे संदर्भिय पत्र क्र.१७ अन्वये लीझ लाईन उपलब्ध करणेबाबत पत्र प्राप्त झाले आहे. प्रभाग समिती क्र.३, प्रभाग अधिकारी यांचे वरील संदर्भिय पत्र क्र.१९ अन्वये इंटरनेट सेवा उपलब्ध करणेबाबत मागणी केलेली आहे. प्रभाग समिती क्र.५, प्रभाग अधिकारी यांचे वरील संदर्भिय पत्र क्र.२० अन्वये इंटरनेट सेवा उपलब्ध करणेबाबत मागणी केलेली आहे. M/s. Oneott Intertainment Limited., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मा. निविदा समितीने दि.१०/०९/२०२० रोजी शिफारस करण्यात आलेली आहे. M/s. Oneott Intertainment Limited.,यांच्या समवेत कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेत आलेला आहे. सदर कामी रु. ९,१०,०००/- (दोन वर्षाकरिता) (अधिक GST) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार अवलोकन करणेस शिफारस असे. मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(अजित मुठे)
उपायुक्त (संगणक)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जनसंपर्क विभाग**

**मा.स्थायी समिती सभा दि.२२/२ /2020**

**// गोषवारा //**

प्रकरण क्र. (७६) मान्यताप्राप्त जाहिरात यादीत वृत्तपत्रांचा नव्याने समावेश व दरवाढ/श्रेणीवाढ लागू करणेकामी मा. स्थायी समिती सभेमध्ये विषयाचे अवलोकन करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका, जनसंपर्क विभागामार्फत महानगरपालिकेतील विविध विभागाकडून येणाऱ्या जाहिर आवाहने, जाहिर निविदा सुचना व इतर जाहिराती महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-2018/प्र.क्र.348/34 दि. 20 डिसेंबर 2018 नुसार 'मोठे' संवर्ग, 'मध्यम' संवर्ग, 'लघु' संवर्ग व साप्ताहिक यांना एका कामाचे मुल्य यानुसार खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे वृत्तपत्रास शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018, दि. 1 जानेवारी 2019 पासून फेरा पध्दतीने दिल्या जात आहे.

<u>वृत्तपत्रांचे संवर्ग</u>

वृत्तपत्रांचे 'लघु', 'मध्यम' व 'मोठे' असे तीन संवर्ग असतील.

| क्र. | वृत्तपत्राचा संवर्ग | वृत्तपत्रांचा किमान व कमाल दैनंदिन खपाचा निकष |
|---|---|---|
| 1 | 'लघु' संवर्ग | 'लघु' संवर्ग दैनिकांसाठी किमान खप 3,001 ते 20,000 प्रती<br>साप्ताहिकांसाठी किमान खप 2,000 ते 10,000 प्रती |
| 2 | 'मध्यम' संवर्ग | 'मध्यम' संवर्ग दैनिकांसाठी किमान खप 20,001 ते 50,000 प्रती<br>साप्ताहिकांसाठी किमान खप 10,001 ते 25,000 प्रती |
| 3 | 'मोठे' संवर्ग | 'मोठे' संवर्ग दैनिक/साप्ताहिकांसाठी किमान खप 50,001 प्रती पेक्षा अधिक साप्ताहिकांसाठी किमान खप 25,001 अधिक |

त्याचप्रमाणे,

| क्र. | जाहिरातीतील कामाचे एकूण मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे सक्षम अधिकार | वृत्तपत्राचा संवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | रु. 50 लाख | जिल्हा माहिती अधिकारी | जिल्ह्यातील 'लघु' संवर्गातील एक दैनिक व 'लघु' संवर्गातील एक साप्ताहिक यांना वितरण (फक्त भूसंपादनाच्या जाहिराती 'मध्यम' व 'लघु' संवर्ग दैनिकास वितरीत करण्यात येतील.) |
| 2 | रु. 50 लाख ते 1 कोटी पर्यंत | विभागीय माहिती उपसंचालक | संबंधित जिल्ह्यातील 'मध्यम' संवर्गातील एक दैनिक व 'मध्यम' संवर्गातील साप्ताहिक (संबंधित जिल्ह्यात मध्यम संवर्गातील दैनिक व साप्ताहिक नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत त्या विभागातील अन्य जिल्ह्यातील दैनिक / साप्ताहिक) |
| 3 | रु. 1 कोटीपेक्षा अधिक | मुख्यालय | 1) संबंधित जिल्ह्यातील / विभागातील 'मोठे' संवर्गातील एक दैनिक व एक साप्ताहिक (साप्ताहिक 'मोठे' संवर्गात असल्यास केवळ समानतेच्या तत्वासाठी या साप्ताहिकचा समावेश दैनिक संवर्गात असेल)<br>आणि<br>2) संबंधित जिल्ह्यातील / विभागातील 'मध्यम' संवर्गातील एक दैनिक<br>आणि<br>3) ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील 'लघु' संवर्गातील एक दैनिक. |

मान्यताप्राप्त जाहिरात यादीत वृत्तपत्रांचा नव्याने समावेश तसेच दर/श्रेणीवाढ करणेबाबत आदेश क्र. जाहिरात/अपपुप्र/2019-20/272, दि. 13 ऑगस्ट 2020 रोजी शासन निर्णय पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयाअन्वये दि. 13/08/2020 रोजीपासून नविन वृत्तपत्रांचा समावेश करणे, दरवाढ/श्रेणीवाढ झालेल्या वृत्तपत्रांना दरवाढ लागू करणे व फेरा पध्दतीने जाहिरात वितरीत कामी सदर प्रकरण मा. स्थायी समितीस अवलोकन करणेकामी शिफारस करण्यात येत आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

सोबत :- शासननिर्णय क्र. जाहिरात/अपपुप्र/2019-20/272,
दि. 13 ऑगस्ट 2020.

(अजित मुठे)
उपायुक्त (मु.)
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\JANSAMPARK\Kamble Sir\गोषवारा (शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018) दि. 13-08-2020.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा.स्थायी समिती सभा दि.२२/२ /२०२१
## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ७७ ) मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, सर्व प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालय, दवाखाने, हॉस्पीटल लोकल एरिया नेटवर्कने जोडणेकामी निविदेचे अवलोकन करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, सर्व प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालय, दवाखाने, हॉस्पीटल लोकल एरिया नेटवर्कने जोडणेकामी जा.क्र. मनपा/संगणक/४५३/२०१८-१९ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०४/०२/२०१९ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी 2019_MBMC_413052_1आहे. सदर निविदेस दि.१४/०२/२०१९ रोजी प्रथम मुदतवाढ व दि. २५/०२/२०१९ रोजी व्दितीय मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. तसेच सदरकामाची दि.०६/०३/२०१९, दि.३१/०८/२०१९ व दि.०७/११/२०१९ रोजी फेर निविदा मागविली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. याकामी दि.१९/११/२०१९ रोजी प्रथम मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदर निविदेचे टेंडर आयडी 2019_MBMC_506272_1आहे. सदर कामास दि.२७/११/२०१९ रोजी द्वितीय मुदतवाढ फेर फेरनिविदा मागविली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. याकामी दि.२१/१२/२०१९ रोजी फेर निविदा मागविण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. तसेच दि.०२/०१/२०२० रोजी प्रथम मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदर निविदेचे टेंडर आयडी 2019_MBMC_524889_1आहे. सदर कामास दि.१३/०१/२०२० रोजी द्वितीय मुदतवाढ फेर निविदा मागविली असता एक निविदा प्राप्त झाली आहे. सदर निविदेचे टेंडर आयडी 2019_MBMC_524889_1 आहे. सदर कामाची निकड पाहता तांत्रिक दराचा लिफाफा उघडणेस दि.२२/०१/२०२० रोजी मा. उपायुक्त (मु.) तथा अति. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. प्राप्त निविदाधारक M/s.S-way Computer यांनी निविदा अटी शर्ती नुसार कागदपत्राची पुर्तता केल्याने पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारक M/s.S-way Computer दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा निवड समितीची दि.१०/०२/२०२० रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. पात्र निविदाधारक M/s.S-way Computer यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| Sr. No. | Description | Qty | Rate Per Unit in Rs. (Including all taxes Excluding GST) | Rate Per Unit in Rs. (Including all taxes Excluding GST) (Total) | वाटाघाटीनंतरचे दर Rate in Rs. (Including all taxes Excluding GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | firwall with 200 user | 1 | 1,50,000/- | 1,50,000/- | 150000 |
| 2. | firwall with 50 user | 6 | 25,000/- | 1,50,000/- | 150000 |
| 3. | firewall with 25 user | 17 | 25,000/- | 4,25,000/- | 425000 |
| 4. | cat 6 cable | 40 | 6,000/- | 2,40,000/- | 200000 |
| 5. | casing patti | 2000 | 55/- | 1,10,000/- | 70000 |
| 6. | 4u rack | 23 | 3,500/- | 80,500/- | 69000 |
| 7. | 36 u rack | 1 | 21,000/- | 21,000/- | 21000 |
| 8. | managable switches | 30 | 15,000/- | 4,50,000/- | 300000 |
| 9. | patch panel | 30 | 3,000/- | 90,000/- | 105000 |
| 10. | i/0 | 400 | 130/- | 52,000/- | 52000 |
| 11. | i/0 boxes | 400 | 100/- | 40,000/- | 40000 |
| 12. | patch code | 800 | 200/- | 1,60,000/- | 96000 |
| 13. | labour per mtr | 8000 | 30/- | 2,40,000/- | 240000 |
| | Amc, Licenses Renewal and Onsite support for 3 years | 1 | | 2,00,000/- | 200000 |
| | Total | | | 24,08,500/- | 2118000 (अधिक GST) |

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.भांखस/२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ च्या नियम पुस्तिकेतील नियम ४.४.३.१ अन्वये कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल. सदर कामी वारंवार निविदा प्रकाशित करुन व मुदतवाढ देऊनही निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने

सदर काम महानगरपालिकेचे नेटवर्क व डाटा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. सबब पात्र निविदाधारक M/s.S-way Computer यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास दि.०३/०३/२०२० रोजी मा. निविदा निवड समितीने शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार M/s.S-way Computer यांच्या समवेत कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस तसेच गोषवारा स्वाक्षरीसह मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.२२/०६/२०२० रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर काम महानगरपालिकेचा data सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असल्याने M/s.S-way Computer यांना निविदा स्विकृती पत्र निर्गमित करुन करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेत आलेला आहे. सदर कामी रु. २१,१८,०००/- (अधिक GST) खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त् विषयाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार अवलोकन करणेस शिफारस असे.

(अजित मुठे)
**उपायुक्त (संगणक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. १०/२/२०२१ वेळ: १२.४० मि.
मा. स्थायी समिती / मा. ~~महासभा~~ गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ...६८...... वर्ष :-2020-21

१०/२/२१

नगरसचिव विभाग
**मिरा भाईंदर महानगरपालिका**